
सत्य नेहमीच
सुंदर आणि
शक्तिशाली
असते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | रविवार ११ मे २०२५ | अंक १४९ पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु








# पाकिस्तानकडून शस्त्रसंधीचं उल्लंघन, लष्कराचं सरकारविरोधातच बंड? नेमकं काय घडतंय?

भारत आणि पाकिस्तान यांच्यात शस्त्रसंधी झाली आहे. दोन्ही देशांनी अधिकृतपणे तसे सांगितले आहे. दरम्यान, दोन्ही देशांतील युद्धजन्य परिस्थिती निवळत आहे, असे सांगितले जात असतानाच भारत-पाकिस्तानने सीमेवर पुन्हा एकदा शस्त्रसंधीचे उल्लंघन केले आहे. याच कारणामुळे सध्या सीमाभागात तणाव निर्माण झाला आहे. नेमकं काय घडलं? मिळालेल्या माहितीनुसार भारत आणि पाकिस्तान सीमाभागात पाकिस्तानने शस्त्रसंधीचे उल्लंघन केले. पाकिस्तानने काश्मीरमध्ये ड्रोन हल्ले केले आहेत. श्रीनगरमध्ये 50 हून अधिक स्फोटांचे आवाज ऐकू आले आहेत. पंजाब, राजस्थान राज्यातील सीमाभागातही ड्रोन दिसल्याचे वृत्त आहे. याच कारणामुळे पंजाब, राजस्थान, जम्मूत ब्लॅकआऊट




करण्यात आले आहे. पंजाबच्या एकूण 9 शहरांत संपूर्णपणे ब्लॅकआऊट करण्यात निर्णय घेण्यात आला आहे. पंजाबच्याही भोगा परिसरात ब्लॅकआऊट करण्यात आले आहे. पाकिस्तानी लष्करांचे बंड? तसं पाहायचं झालं तर पाकिस्तान सरकारनेच भारताला कॉल करून शस्त्रसंधीच्या चर्चेला सुरुवात केली होती. त्यानंतर मात्र अवघ्या काही तासांत पाकिस्तानच्या लष्कराने भारतावर हल्ले केले आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार पाकिस्तानी लष्कर आता पाकिस्तानी सरकारच्या विरोधात गेले आहे. त्यामुळेच आता पाकिस्तानी आर्मीने पाकिस्तानी सरकारविरोधात बंड तर केले नाही ना? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. दरम्यान, आता पाकिस्तानने शस्त्रसंधीचे उल्लंघन केल्यावर भारत सरकार आणि लष्कर नेमकी काय भूमिका घेणार? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. भारत आणि पाकिस्तान दरम्यान सुरु असलेला संघर्ष थांबवण्याचा निर्णय शनिवार घेण्यात आला. दोन्ही देशांनी आंतरराष्ट्रीय सीमेवर युद्धविराम करण्याची घोषणा केली. त्याचवेळी भारताने सीमेपलीकडून काहीही कारवाई झाली तर भारत ठोस प्रत्युत्तर देणार असल्याचे सांगण्यात आले. पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानवर कारवाई करत ९ अतिरेकी तळ उद्ध्वस्त केले होते. भारताचे ऑपरेशन सिंदूर कमालीचे यशस्वी झाले. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानला जोरदार प्रत्युत्तर दिले. अगदी पाकिस्तानला गुडघे टेकण्यास भाग पडले. त्यामुळे पाकिस्तानकडे आत्मसमर्पण करण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता. पाकिस्तानविरुद्धच्या संघर्षात भारताच्या हवाई संरक्षण प्रणालीने जोरदार कामगिरी केली. स्वदेशी बनावटीचे आकाश क्षेपणास्त्रे, बराक-८ एमआरएसएएम, ड्रोनविरोधी तंत्रज्ञान आणि हारोप ड्रोन यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. भारताने संरक्षण यंत्रणेद्वारे जगाला आपली ताकद दाखवून दिली आहे. सलग तीन दिवस सुरू असलेल्या या संघर्षात पाकिस्तानने शेकडो ड्रोन वापरून भारताच्या संरक्षण यंत्रणा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. परंतु पाकिस्तानच हा प्रयत्न भारताने उधळून लावला. पाकिस्तानच्या मध्यम ते लांब पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांनी भारताच्या हवाई संरक्षण यंत्रणेत घुसखोरी करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांचे सर्व नापाक प्रयत्न अयशस्वी ठरले. एस-४०० हवाई संरक्षण प्रणालीने सर्व हल्ले पूर्णपणे हाणून पाडले आहेत. भारत आणि पाकिस्तान संघर्षाच्या माध्यमातून भारताने आपल्या सर्व प्रगत आणि स्वदेशी लष्करी उपकरणांची यशस्वी चाचणी घेतली. त्यामुळे भारताकडे जगातील सर्वोत्तम लढाऊ विमाने आहेत, हे सिद्ध झाले. भारताने भारत-पाकिस्तान संघर्षात भारताने राफेल, तेजस आणि आकाश क्षेपणास्त्रांचा वापर करून पाकिस्तानवर कहर केला आहे.

# भारतीय सैनिकांसाठी आज बीडमध्ये मोटरसायकल तिरंगा रॅली देशभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आव्हान द्वारकधीश मित्र मंडळाने केले आहे

बीड (प्रतिनिधी) पहलगाम हल्ल्यानंतर ऑपरेशन सिंदूर राबवत भारताने पाकिस्तानातील दहशतवादी अड्डे उद्धस्त केले. पाकिस्तानच्या प्रत्येक हल्ल्यावर जशास तसे उत्तर भारत देत आहे. भारतीय सैनिकांचे मनोबल वाढविण्यासाठी उद्या दि.11 मे 2025 रोजी सकाळी दहा वाजता बीडमध्ये मोटार सायकल रॅली काढण्यात येणार आहे. एक देशभक्त, भारतीय नागरिक म्हणून ही रॅली काढण्यात येणार आहे. यामध्ये देशभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आव्हान द्वारकाधीश मित्र मंडळाने केले यांनी केले आहे. भारतीय सैनिकांनी जम्मू काश्मीर मधील पहलगाम हल्ल्यानंतर 'ऑपरेशन सिंदूर' राबवत शत्रू राष्ट्र असलेल्या पाकिस्तानवर एअरस्ट्राइक करत प्रत्युत्तर देऊन अनेक दहशतवादी अड्डे उद्धवस्त केले. पहलगामच्या हल्ल्यातील नागरिकांच्या जखमा ओल्या असताना क्षणार्धात पाकिस्तानात घुसून आपल्या भारतीय भुदल,नौदल आणि हवाईदलाच्या जांबाज आधिकाऱ्यांनी आणि जवानांनी दाखविलेल्या साहसाला आणि धैर्याला सलाम करून खरोखरचं देशप्रेमाची भावना जागी करण्यात आली. यामुळे बीडमध्ये उद्या दि. 11 मे रोजी सकाळी 10 वाजता तिरंगा रॅली काढून भारतीय जवानांचे मनोबल वाढविण्यात येणार आहे. सकाळी 10 वाजता महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यापुतळ्यापासून दुचाकी रॅलीला सुरुवात होणार आहे. माळीवेस, सुभाष रोड, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चौक मार्गे छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ रॅलीचा समारोप करण्यात येणार आहे. यामध्ये देशभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आव्हान द्वारकाधीश मित्र मंडळाने केले आहे.




# देवगाव येथील रस्त्याच्या निकृष्ट कामाची चौकशी करुन रस्ता पुन्हा करण्यासाठी अमरण उपोषण



सारणी । प्रतिनिधी केज तालुक्यातील देवगाव येथील राज्यमार्ग देवगाव ते रेणुकामाता मंदिर देवगाव या रस्त्याचे काम मागील महिन्यामध्ये झाले आहे. संबधीत गुतेदाराला वारंवार सांगुन पण त्याने काम चांगले केले नाही त्या कामाला एक महिना झाला नाही , तरी संबंधीत रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे उकडले आहे. संबधीत गुत्तेदाराने इस्टीमेंट प्रमाणे काम न करता थातुर मातुन आणि बोगस काम करुन शासनाची व आमची गावकऱ्यांची फसवणुक केलेली आहे. त्यामुळे कामाची चौकशी करुन संबधीतावर कायदेशीर कार्यवाही करावी तसेच हा रस्ता आमचे जगृत दैवत रेणुकामाता मंदिराकडे जाणारा आहे या रोडवर लोकांची सारखी ये जा आसते तसेच या रोडलगत गावातील वस्त्या जोडलेलया आसल्यामुळे हा रोड आम्हाला डबल झाला नाही तर आमचे फार नुकसान होणार आहे. परंतू हा रस्ता पाच वर्षे दुरुस्त होणार नाही तरी कामाची चौकशी, क्वॉलिटी कट्र ेल मार्फत करुन सदरील एजन्सीला काळया यादीमध्ये टाकावे व संबंधित अधिकाऱ्याला निलंबित करण्यात यावे जर आशी मागणी येथील सामाजिक कार्यकर्ते कैलास मुंडे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे के ली आहे. आमची मागणी पुढील दहा दिवसामध्ये मान्य नाही झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मी गावकऱ्यासह आमरण उपोषण करणार आहे.

# हिंदू-मुस्लिमांचं श्रध्दास्थान हजरत मौलाली बाबांचा यात्रोत्सव

कडा (प्रतिनिधी) कडा येथील ग्रामदैवत तथा सर्वधर्मियांचं श्रध्दास्थान म्हणून नावलौकिक असलेल्या हजरत मौलाली बाबांचा यात्रोत्सव मंगळवार ६ मे पासून सुरू झाला असून सोमवारी दि.१२ मे रोजी मोठ्या उत्साहात यात्रा-उरूस संपन्न होणार आहे. आष्टी तालुक्यातील कडा हिंदू -मुस्लिम एकोपा जोपासणारं गाव म्हणून मराठवाड्यात नावलौकिक आहे. याठिकाणचा यात्रोत्सव सामाजिक एकतेचे प्रतीक मानला जातो.कडीनदीच्या किनारी ग्रामदैवत तथा सर्वधर्मियांचं श्रद्धास्थान हजरत मौलाली बाबांची दर्गाह आहे.दरवर्षी सर्वधर्मिय ग्रामस्थ एकत्रितपणे



खेळीमेळीच्या वातावरणात हा उत्सव साजरा करतात. व्यवसाय,नोकरीनिमित्त बाहेरगावी गेलेले नागरिक बाबांच्या यात्रेच्या निमित्ताने आवर्जून हजेरी लावतात. बुध्द पौर्णिमेला यात्रेला सुरूवात होते.पौर्णिमेच्या अगोदर येणा-या बुधवारी हजरत मौलाली बाबांना संदल लावतात.यावर्षी सोमवारी दि.१२ मे रोजी यात्रा-उरूस असून सर्व ग्रामस्थ एकत्रित येऊन बाबांची सवाद्य छबीना मिरवणूक काढतात.बाबांच्या समाधीला फुलांची चादर अर्पण करून श्रीफळ, मलिदा ,गुळ-खोब-याच्या शेरणीचा प्रसाद दाखवून भाविक-भक्त आपली इच्छापुर्ती करतात.त्याच दिवशी पहाटेच्या दरम्यान शोभेच्या रंगीत फटाक्यांची आतिषबाजी लक्षवेधी असते.हा नेत्रदीपक सोहळा पाहण्यासाठी महिला,पूरूष, बालगोपाळ देखील सहभागी होतात.तर दुस-या दिवशी नामवंत मल्लांच्या कुस्तीची दंगल आयोजित करण्यात येते.नदीकाठी थाटलेल्या विविध दुकानांना विद्युत रोषणाईने सजविण्यात येते. यात्रेत आलेली मनोरंजनाची साधने यात्रेकरूंची लक्षवेधुन घेतात.कडयाची यात्रा म्हणजे हिंदू -मुस्लिम बांधवांच्या एकतेचं प्रतीक मानली जाते, यातूनच सामाजिक एकोप्याचे दर्शन अनुभवायला मिळते.हा यात्रोत्सव शांततेत साजरा करण्यासाठी सरपंच,उपसरपंच, ग्रा.प.सदस्य, यात्रा कमिटी,ग्रामस्थ,दर्गा चे आर्चक,पोलिस प्रशासन, एकत्रितपणे परिश्रम घेताना पहायला मिळतात.हेच हजरत मौलाली बाबांच्या यात्रेचं वैशिष्ट्य मानलं जातं.

# जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केली जिल्हा रुग्णालयाची पाहणी

बीड (प्रतिनिधी) बीड जिह्लाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज जिह्ला रुग्णालयाची अचानक पाहणी करत रुग्णसेवा, वैद्यकीय सुविधा आणि व्यवस्थापनाची सखोल माहिती घेतली. त्यांनी रुग्णालयातील विविध विभागांना भेट देऊन रुग्णांशी आणि कर्मचाऱ्यांशी थेट संवाद साधला. पाहणी दरम्यान जिह्लाधिकाऱ्यांनी ओपीडी, इनडोअर वॉर्ड, औषध वितरण कक्ष, ऑपरेशन थिएटर, महिला व बालरोग विभाग, तसेच प्रयोगशाळा विभागांची तपासणी



केली. रुग्णांकडून उपचार, औषधे, स्वच्छता आणि कर्मचारी वर्गाच्या वागणुकीबाबत थेट माहिती घेतली. काही रुग्णांनी समाधान व्यक्त केले तर काहींनी किरकोळ अडचणी मांडल्या.जिह्लाधिकाऱ्यांनी रुग्णालय प्रशासनाला सूचना दिल्या की, प्रत्येक रुग्णाला दर्जेदार सेवा मिळायला हवी. त्यांनी यंत्रणांमध्ये पारदर्शकता, वेळेवर उपचार आणि स्वच्छतेवर भर देण्याचे निर्देश दिले. या पाहणीत जिह्ला शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत, आरएमओ डॉ. संतोष शहाणे, बाह्य विभागाचे आरएमओ डॉ. लक्ष्मीकांत, डॉ. हनुमंत पारखे, मुख्य अधीसेविका रमा गिरी, प्राचार्य डॉ. सुवर्णा बेदरे आणि इतर विभागप्रमुख उपस्थित होते. पाहणीच्या शेवटी जिह्लाधिकाऱ्यांनी चांगली सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांचे कौतुक करून त्यांना शाब्बासकी दिली. काही विभागांमध्ये तातडीने सुधारणा करण्याचे आदेशही त्यांनी दिले. जिह्लाधिकाऱ्यांच्या या पाहणीमुळे आरोग्य यंत्रणेत जागरूकता वाढणार असून, नागरिकांना अधिक चांगल्या सेवा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. रुग्णालय प्रशासनाने त्यांच्या सूचनांचे तात्काळ पालन करण्याचे आश्वासन दिले आहे.

# प्रशासनाचा संथ कारभारामुळे लोकसहभागातून केलेला शेतरस्ता मोकळा करण्यासाठी शेतकरी बेजार आणि दुसरीकडे प्रशासनाची सस्ती अदालत म्हणजे जिल्हा प्रशासनाची प्रसिद्धी मिळवण्यासाठी केलेली स्टंटबाजी :- डॉ.गणेश ढवळे

---- लिंबागणेश:-( दि.१०) एकीकडे शेतकऱ्यांनी अतिक्रमित शेतरस्ते,पाणंद रस्ते मोकळे व्हावेत ,त्यांना जलद न्याय मिळावा हा उद्देश समोर ठेवून प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या चौथ्या शुक्रवारी सस्ती अदालत हा उपक्रम तहसील कार्यालय, मंडळ मुख्यालयाच्या ठिकाणी राबवला जाणार असून याचा लाभ शेतकऱ्यांना होणार आहे अशी विविध दैनिकातून प्रसिद्धी जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात येऊन स्वतःची पाठ थोपटून घेतली जात आहे. दुसरीकडे लोकसहभागातून तयार केलेले शेत रस्ते मोकळे करून देण्यात यावेत यासाठी वारंवार जिल्हा प्रशासन,तहसील प्रशासन यांच्या दारी खेटे मारून त्यांचे जोडे झिजले आहेत. परंतु त्यांना जिल्हा प्रशासन शेत रस्ता मोकळा करून देण्यास दिरंगाई करत आहे. त्यामुळे एकंदरीतच शेत रस्ते मोकळे करण्यासाठी राबवले जाणारे सस्ती अदालत हा जिल्हा प्रशासनाचा प्रसिद्धी मिळवण्यासाठी स्टंटबाजी असून जिल्हा प्रशासनाने जलद गतीने शेतकऱ्यांना न्याय देऊन शेत रस्ते,पाणंद रस्ते मोकळे करून द्यावेत.तसेच ग्रामीण भागात शेत वस्तीवर जाण्यासाठी दळणवळणाची साधने व मजुरांच्या हाताला काम मिळावे या उदात्त हेतूने सुरू केलेली मातोश्री ग्राम समृद्धी शेत /पाणंद रस्ते योजनेंतर्गत शेत रस्ते पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्यात यावेत.अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे. वर्षभरापासून तहसील कार्यालयाच्या चकरा मारून जोडे झिजले पण अजुनही रस्ता मोकळा करण्यात आला नाही :- शाकिंदर काटकर --- मुळकवाडी- मसेवाडी शिवरस्ता मोकळा करून देण्यात यावा यासाठी शेतकऱ्यांनी आक्षेप घेतल्यानंतर ३ वर्षांपूर्वी भूमी अभिलेख कार्यालयात २१,००० रुपये मोजणी फीस भरली.



त्यानंतर दोन वर्ष भूमी अभिलेखचे कर्मचारी मोजणी करण्यासाठी आलेच नाहीत. सहा महिन्यापूर्वी १ ऑक्टोबर रोजी लिंबागणेश येथे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या अध्यक्षतेखाली महसूल मंडळाची बैठक झाली होती. तेव्हा मसेवाडी येथील ग्रामस्थांनी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना लेखी निवेदन दिल्यानंतर त्यांनी भूमी अभिलेखच्या कर्मचाऱ्यांना आदेश देऊन खुणा निश्चिती करून देण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर खुणा करून दिल्या मात्र दोन तीनशे शेतकऱ्यांपैकी चार ,पाच शेतकऱ्यांना त्या मान्य नसल्याने त्यांनी रस्ता अडवला असून लोक सहभागातून ४-५ लाख रुपये खर्च खर्चून ७० टक्के रस्ता तयार झाला असून केवळ अर्धा किलोमीटर रस्ता बाकी आहे. पावसाळा तोंडावर आला असुन पावसाळ्यात खते ,बि बियाणे, आणि शेतातील शेतीमाल आदी ने आण करण्यासाठी अडचण येते. त्यामुळे पावसाळ्यापुर्वी महसूल प्रशासनाला आम्हाला तातडीने रस्ता मोकळा करून देण्यात यावा अशी आमची मागणी असल्याचे शाकींदर काटकर यांनी सांगितले. पावसाळ्यात गुडघाभर चिखलातून शाळा, बाजारहाट, दवाखाना याची अडचण :- छाया निर्मळ --- पावसाळ्यात शाळा सुरु झाल्यानंतर शाळकरी मुलांना गुडघाभर चिखलातून शाळेत जायला लागतं. आठवडी बाजार,माळवं, रात्री अपरात्री दवाखान्यात जायचं म्हणलं तरी आम्हाला मोठी अडचण आहे त्यामुळे पावसाळ्या अगोदर रस्ता करण्यात यावा अशी मागणी छाया निर्मळ यांनी केली आहे. तहसीलदार यांच्या आदेशानुसार भुमि अभिलेख कर्मचाऱ्यांनी करून दिलेल्या खुणा ४-५ शेतकऱ्यांना मान्य नाही म्हणून रस्ता काम रखडले : रामकिसन कदम सरपंच मुळुकवाडी --- तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी स्वतः भेट देऊन भुमि अभिलेख कर्मचाऱ्यांना ३३ फुट रस्त्यासाठी खुणा करून दिल्या होत्या.२०० शेतकऱ्यांना या मान्य असुन ४-५ शेतकऱ्यांना मान्य नसल्याने त्यांनी काम अडवल्याने ७० टक्के काम पूर्ण झाले असुन ३० टक्के काम अपूर्ण आहे. प्रशासनाने रस्ता मोकळा करण्यास मदत करावी.अशी मागणी सरपंच मुळुकवाडी रामकिसन कदम यांनी केली आहे. प्रशासनाने पावसाळ्यापूर्वी शेत रस्ते पाणंद रस्ते पुर्ण करावेत ; सस्ती अदालत सारखी स्टंटबाजी करू नये :- डॉ.गणेश ढवळे --- ग्रामीण भागात शेतवस्तीवर जाण्यासाठी दळणवळणाची साधने व मजुरांच्या हाताला काम मिळावे या उदात्त हेतूने मातोश्री ग्राम समृद्धी शेत/ पाणंद रस्ते योजना अस्तित्वात आणली. पावसाळ्यापुर्वी शेत रस्ते पूर्ण हवेत या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले होते.रस्ते मोकळे करण्यासाठी शेतकरी शासनाच्या दरबारी वारंवार चकरा मारत असूनही त्यांना न्याय मिळत नाही. सध्या शेत रस्ते , पाणंद रस्ते मोकळे करण्यासाठी राबवली जाणारी सस्ती अदालत योजना केवळ स्टंटबाजी असून शेतकऱ्यांना प्रशासनाने तातडीने न्याय द्यावा व पावसाळ्यापूर्वी शेत रस्ते, पाणंद रस्ते पूर्ण करण्यासाठी सहकार्य करावे अशी मागणी डॉ . गणेश ढवळे लिंबागणेशकर केली आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार ११ मे २०२५
https://lokaarambh.com



संपादकीय

## आईच मातृप्रेम

सर्वप्रथम मातृदिनाच्या खूप खूप शुभेच्छा. मी जेव्हा लहान होती तेव्हा शाळेत निबंध लिहिली होती. आज परत मातृदिनाबद्दल थोडसं बोलू इच्छिते. आई या दोन वाक्यातच देव आहे. आई ही दुधावरच्या साईप्रमाणे असते. अगदी कोमल आणि नरम असते . कितीतरी वेदना सहन करणारी ती म्हणजे आई असते. लेकरांवर निस्वार्थपणे प्रेम करते. नऊ महिने नऊ दिवस बाळाला गर्भात ठेवून जन्म देते, ती म्हणजे आई. आई बद्दल जेवढे बोलावं तेवढं कमीच पडेल. मी प्रत्येकांना सांगू इच्छिते की, अरे आईची आई होऊन बघा.. ना...! कधीतरी. मग तुम्हाला समजेल की मातृप्रेम काय असते. आई ही आई असते. आईची जागा कधीच कोणी घेऊ नाही. आई मुलांवर खूप चांगले संस्कार करते.

असं कधी झालंय काय मुलं आधी उठले आणि आई नंतर नाही...! ना....! आधी मुलांना जेवण घालते. , नंतर आई जेवते. स्वतःच्या आधी मुलांचा विचार करणारी ती म्हणजे आहे. आपल्या प्रत्येक अडचणीला धावून येणारी म्हणजे आईच असते. आपल्याला काय हवं...नको ... आपली काळजी घेणारी... ती म्हणजे आहे. मला मान्य आहे की आईचं कर्तव्य असते, मुलांची काळजी घेणे आणि मुलांवर चांगले संस्कार देणे. पण मुलांचे देखील कर्तव्य आहे. ना...! की, आपल्या आईची काळजी घेणे. आपल्या आईला विचारणे तू कशी आहेस, आणि तुझी तब्येत कशी आहे म्हणून. मुलांना आपल्या आईचं मातृप्रेम कळलं पाहिजे.

अरे एकदा त्या आईच्या कुशीत जाऊन बघा... मग तुम्हाला मातृप्रेम दिसेल. तुम्हाला पूजा करायची आहे ना...! तर ,मंदिरात जाण्यापेक्षा घरी असलेल्या आईची पूजा करा...! देव असं म्हणत नाही की, तुम्ही आधी मंदिरात या म्हणून...! देव असं म्हणतो की " मी प्रत्येक ठिकाणी आपली मदत करायला येऊ शकत नाही. म्हणून देवाने आईला पाठविले आपल्या मदती करता." म्हणून आपण आधी आपल्या आईचा आदर, सन्मान केला पाहिजे . मग माझ्या दर्शनाला या. मुलांच्या डोळ्यात अश्रू आले की आईच्या डोळ्यात आपोआपच अश्रूंच्या धारा वाहू लागतात . यालाच तर म्हणतात मातृप्रेम.

मी प्रत्येकांना सांगू इच्छिते की कधीतरी आईची आई होऊन वागा ना... आपल्या आईला कधी दुखावू नका. आई जे म्हणेल ते करा. कारण आपल्यासाठी काय योग्य आहे? ते आपल्यापेक्षा आपल्या आईला जास्त कळते. माझंचं बघा ना....!माझे सर्व निर्णय माझी आई घेत असते...कारण तिला सर्व कळते. मी काय ...करावं आणि काय नको...ती एक उत्तम लेखिका आहे... आजपर्यतचे आमचे सर्व निर्णय ती स्वतः घेऊन आमच्या पाठीशी खंबीर उभी आहे. माझ्यासाठी माझी देव म्हणजे माझी आई..खरं सांगायचं म्हणजे, आपण देवाकडे असे कधी मागितले काय? की माझ्या आईची काळजी घ्या... आणि माझ्या आईला सुखात ठेवा ....!कधीतरी मागून बघा. मुलगा किंवा मुलगी कितीही मोठे झाले तरी आपल्या आईसाठी लहानच असतात. आपण जगाच्या पाठीवर कुठेही जाणार तरी आईची ममता आपला खुशीतच दिसून येईल.

मला एकच सांगायचं आहे आपण कितीही मोठी गरुड झेप घेतली आणि कितीही मोठी प्रगती केली. तरी आपल्या आईला कधीच विसरायचं नाही. कारण ती होती म्हणून आज आपण इथपर्यंत येऊ शकले. आणि आई आपल्यासाठी जेवढं करते तेवढं कोणीच करू शकत नाही. मुलं आपल्या आईचे उपकार कधीच फेडू शकत नाही. म्हणून मी सांगते आपल्या आईला जपा. तिचा आदर, सन्मान करा. आपण लहान होतो तेव्हा ती आपल्याला फुलासारखी जपायची...! मग आपण मोठी झाल्यावर आपलं देखील काम आहे. तिला फुलासारखं जपलं पाहिजे. हे प्रत्येक मुलांनी केलं पाहिजे. आई कितीही रागविली तरी, तिच्या रागातच ममत्व असते. आपल्याला सगळ्यात आधी प्राधान्य द्यायचं असेल, तर आपल्या आईला दिला पाहिजे. कारण आईसारखे दुसरे दैवत कोणीच असू शकत नाही ..! आपणांस एक उदाहरणार्थ सांगायचं झाले, आपल्याला महाराष्ट्रातील प्रसिद्ध नेत्र सर्जन पद्मश्री डॉ.तात्या लहाने,यांच्या दोन्ही किडण्या निकामी झाल्या होत्या ...तेव्हा त्यांच्या आईनं त्यांना आपली एक किडनी दिली. आणि त्यांना जीवनदाना दिले. हिच खरी आई...आपल्या त्या आईने हा विचार केला, नाही मी कशाला देऊ ...पण मला काहीही झाले तरी चालेल ...माझा लेकरू वाचला पाहिजे ..! माझ्याही बाबतीत असच एकदा झाले होते मी बारावीला असताना ...कोरोना सुरूच होता ...आणि ॲनलाईन क्लास करावे लागायचं ..माझ्या डोळ्यांना खूप त्रास होत होता ...अचानक एके दिवशी माझ्या डोळ्यांच्या बाहुल्या वर जायला लागले. मी समोर बघितले तरी ते वर दिसायचे आणि मला भीती वाटली ...मला माझी आई विचारली तु अशी का? बघते.. तुझे डोळे असे का दिसत आहे...तेव्हा मला माझी आई कुठल्याही विचार न करता डॉंक्टरकडे घेऊन गेली ...लगेचच उपचार सुरू केली...माझे पपा खूप रागवायचे. पण, आई ही आईचं असते...तिची जागा कोणीच घेऊ शकत नाही... ती रात्रभर आपल्या पोटाशी धरून झोपली ...डोक्यावरून वारंवार प्रेमाने हात फिरवत होती ...आणि मी तेव्हा निवांत झोपली... आज माझे डोळे माझ्या आईच्या समयसुचकतेमुळे सुखरूप आहे...मी माझ्या आईची ऋणी आहे. माझी आई माझ्यासाठी किती धडपड करते हे मलाच माहिती आहे .अख्या जगाशी माझी आई माझ्यासाठी भांडू शकते. मी माझ्या आईचे उपकार कधीच फेडू शकत नाही. पण मला उपकाराची परतफेड करायची असेल तर मी तिचा आदर आणि सन्मान करूनच करेन. कारण ती होती आणि तिने मला जन्म दिले म्हणून मी आज इथपर्यंत पोहोचू शकले.....

कु सिद्धी ज्योत्स्ना भास्कर बनसोड
कुरखेडा, गडचिरोली
7378 47 0441

# ११ मे १८८८ रोजी जोतिराव फुले महात्मा जोतिराव फुले झाले .(११ मे महात्मा पदवी गौरव दिन )

साभार:- प्रा. परमेश्वर बनकर, बीड 9503288282

जनतेने सभा भरवून फुलेंना महात्मा ही पदवी बहाल केली. जनतेने सभा भरवून महात्मा ही पदवी बहाल केलेले जोतिराव फुले हे एकमेव कृतिशील समाजसुधारक व विचारवंत ठरतात.

अज्ञानाच्या अंधकारात अडकलेल्या बहुजन समाजाला ज्ञानाच्या प्रकाशात आणण्यासाठी जीवनभर ज्यांनी कार्य केलं. अस्पृश्यतेच्या विरोधात कृतिशील आंदोलन उभं केलं. स्वतः च्या घरातील पाण्याची विहीर अस्पृश्यांसाठी खुली केली. विधवा पुनर्वीवाह असेल किंवा आंतरजातीय विवाह असतील असे जाती अंताचे अनेक उपक्रम त्यांनी राबवले. चार भिंती मध्ये बंदिस्त असलेल्या महिलांना मुक्त श्वास घेण्याचा अधिकार दिला. छत्रपती शिवरायांच्या समाधीच्या शोधा बरोबरच पहिली शिवजयंती साजरी करून महाराजांवरती पहिला पोवाडा लिहिला. शेतकऱ्यांची दयनीय अवस्था का झाली हे शेतकऱ्यांचा असूड या पुस्तकातुन दाखवून दिले. 1882 मध्ये हंटर कमिशन समोर प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे करण्यात यावं ही मागणी केली अशी मागणी करणारे जोतिराव फुले हे पहिले समाजसुधारक ठरतात. आपल्या साहित्यामध्ये बळीराजाचा, खंडोबाचा, हिरण्यकश्यपु, बुद्ध, तसेच शूरवीर महार जातींचा इतिहास मांडला आहे. संपूर्ण जगाला मानवतेकडे घेऊन जाईल असा सार्वजनिक सत्यधर्म नावाचा ग्रंथ निर्माण केला.फुलेंची प्रेरणा घेऊन अनेक चळवळी, अनेक विचारवंत व समाजसुधारक उदयास आले. जोतिरावांच्या नेतृत्वात भारतातली पहिली कामगार संघटना उभी राहिली. शेतकऱ्यांचे प्रश्न मांडणारे दिन बंधू वृत्तपत्र उभे राहिले. सत्यशोधक समाज स्थापन करून सर्व जाती धर्माच्या लोकांना त्या मध्ये समाविष्ट करून घेतले. अश्या या कृतीशील समाजसुधारकाच्या प्रति आदर म्हणून मुंबई मधील भायखळा येथे असलेल्या रघुनाथ महाराज सभागृहामध्ये मुंबईयेथील जनतेने जोतिराव फुलेंना वयाच्या 61 व्या वर्षी महात्मा ही पदवी बहाल केली. सदरील समारंभास रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे,रावबहादूर वंडेकर,स्वामी रामय्या अय्यावारू, मोरो विठ्ठल वाळवेकर इत्यादी मातब्बर मंडळी उपस्थित होती. पदवी दान कार्यक्रमानंतर महात्मा फुलेंनी भाषण केलं. जनतेचं प्रेम पाहून फुलेंचं मनभरून आलं. महात्मा फुलेंनी उपस्थित सर्वांचे आभार मानले आणि जोतिराव फुले महात्मा झाले.

# जेएनयू - निवडणुका, चळवळ आणि व्यवस्था!

जवाहरलाल नेहरू विद्यापीठ! भारतातील सुमारे ११०० विद्यापीठांपैकी एक. मात्र कायम चर्चेत असणारं! विद्यापीठांच्या जागतिक क्रमवारीमध्ये भारतातील क्रमांक एकचे विद्यापीठ ते राष्ट्रविरोधी विचारसरणीसाठी बदनाम अशा अनेक ओळखींनी व्यापलेले ! समाजमाध्यमांवर येथील विद्यार्थी, त्यांची विचारसरणी, राहणीमान, स्वातंत्र्याची संकल्पना, विद्यार्थी-विद्यार्थिनींची सामाजिक-आर्थिक-राजकीय आणि अगदी लैंगिक मते हा सामान्यांसाठी कुतूहलाचा आणि जल्पकांचा खिल्ली उडविण्याचा विषय! कोणत्याही सामाजिक घटकाची सर्वोच्च सार्वजनिक कृतिशीलता ही राजकीय क्षेत्रात दिसते. आणि राजकीय वर्तुळात निवडणूक ही सर्वोच्च गोष्ट मानली जाते. कोणत्याही समाज घटकाचे अथवा देशाचे मूल्यमापन करताना निवडणुकांची गुणवत्ता हा कळीचा मुद्दा ठरतो. त्यांवर त्या घटकाची सामाजिक, राजकीय आणि बौद्धिक परिपक्वता यांचे आकलन होण्यास मदत होते. जेएनयू हा सुमारे आठ हजार विद्यार्थ्यांचा एक शैक्षणिक-सामाजिक घटक! मात्र एखादी बातमी विद्यापीठाच्या कानाकोपऱ्यात पोहोचण्याआधी देशांतील प्रमुख माध्यमे व्यापतात. बऱ्याचदा विद्यार्थ्यांना असा अनुभव येतो की आवारातील एखादी घटना त्यांच्यापर्यंत येण्याआधी दूरवर वसलेल्या त्यांच्या पालकांपर्यंत पोचलेली असते. एकूणच देशाच्या चर्चापटलावर जेएनयूची मागणी जास्त! त्यातच मागच्या आठवड्यात इथे निवडणुका झाल्या. डाव्यांचा गड मानल्या जाणाऱ्या या विद्यापीठात अभाविप या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अधिपत्याखालील विद्यार्थी संघटनेने केंद्रीय स्तरावर एक तर विभाग स्तरावर ४२ पैकी २३ जागांवर विजय मिळविला. निवडणुकांमध्ये केवळ जीत वा हार यावर केले जाणारे अवलोकन बऱ्याचदा अपुरे असते. जेएनयू निवडणुकांचे वेगळेपण अधोरेखित करण्याचा हा प्रयत्न! कोणत्याही निवडणुकांमध्ये वेगवेगळे दबाव गट काम करत असतात. विद्यापीठीय विद्यार्थी हा असाच एक दबाव गट! इतिहासात डोकावून पाहिल्यास भारताच्या आणि जगाच्या राजकारणात विद्यार्थ्यांनी महत्वाची भूमिका बजावली आहे. अमेरिकेच्या व्हिएतनाम संघर्षातील अमेरिकेच्या माघारीबद्दल चवीने चर्चा केली जाते. मात्र त्याच्या मागे १९६४ ते १९७२ दरम्यान कॅलिफोर्निया विद्यापीठाच्या बर्कले कॅम्पसमध्ये सुरू झालेल्या 'फ्री स्पीच मूव्हमेंट'चा दबाव होता. १९८९ मधील बीजिंगच्या तीआनमेन चौकातील निदर्शने तर विद्यार्थ्यांच्या लोकशाहीच्या मागणीसाठी आणि सरकारच्या दडपशाहीसाठी प्रसिद्ध आहेतच! भारताचा विचार करता १९७४ मध्ये गुजरातमध्ये नवनिर्माण आंदोलनाने जोर पकडला होता. अन्नधान्यांच्या वाढलेल्या किमती आणि भ्रष्टाचाराविरोधातील या आंदोलनामुळे गुजरातचे तत्कालीन मुख्यमंत्री चिमणभाई पटेल यांना राजीनामा द्यावा लागला. यापासून प्रेरणा घेऊन बिहारमध्ये विद्यार्थ्यांनी जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण क्रांतीचा नारा दिला. यातूनच आंदोलन डोईजड जात आहे असे इंदिरा गांधी सरकारला वाटले आणि देशभर आणीबाणी लादली गेली. २०१३ मध्ये निर्भया बलात्कार प्रकरणानंतर सरकारविरोधी आंदोलन उभे जेएनयू विद्यार्थी संघटनेचा महत्वाचा वाटा होता. बऱ्याच जणांना आश्चर्य वाटेल, मात्र त्याकाळी विरोधात असणारा भाजप आणि जेएनयू यांनी हे आंदोलन उभारण्यात एकमेकाला पूरक भूमिका बजावली होती. एकूणच विद्यार्थी राजकारण हा दुर्लक्ष करण्यासारखा विषय नाही. या राजकारणाला दिशा देण्याचं, अजेंडा ठरविण्याचं, विद्यार्थी चळवळींचे पसंतीक्रम ठरविण्याचं काम या निवडणुका करतात. १९८९ साली मुंबईतील जितेंद्र चौहान कायदा महाविद्यालयात एनएसयूआयचे उमेदवार ओवेन डिसोझा यांची हत्या झाली. या घटनेनंतर महाराष्ट्र सरकारने १९७४ च्या सार्वजनिक विद्यापीठ कायद्यात सुधारणा करत १९९३ मध्ये विद्यार्थी संघटनांच्या निवडणुकांवर बंदी घातली, जेणेकरून कॅम्पसमधील हिंसाचार आणि गटबाजी टाळता येईल. ही बंदी आजतागायत लागू असल्याने केंद्रीय विद्यापीठे आणि काही अभिमत विद्यापीठे वगळता महाराष्ट्रामध्ये विद्यार्थी संघटनांच्या निवडणुका होत नाहीत. या पार्श्वभूमीवर एवढ्या वर्षांची परंपरा असून, टोकाची स्पर्धा असतानादेखील शांततापूर्ण रीतीने होणारी जेएनयूची निवडणूक वाखाणण्यासारखी आहे. दरवर्षी जवाहरलाल नेहरू विद्यापीठ विद्यार्थी संघ निवडणुकांचा आठवडा सुरू होतो, तेव्हा विद्यार्थी ध्वज, डफली आणि घोषवाक्यांसहित उत्साहपूर्ण मोर्चांमध्ये एकत्र येतात. वेगवेगळ्या घोषणांवर सर्वच विद्यार्थी संघटनांचे कार्यकर्ते ताल धरतात तेंव्हा त्यांचा उत्साह पाहण्यासारखा असतो.

# नावाप्रमाणेच सगळं बीड पण अंधः कारमाय परिस्थितीत- सोनल पाटील

बीड । प्रतिनिधी शहराला पिण्याच्या पाण्याच्या पाईप लाईन मध्ये सडलेली कुत्री आढळून आलीत, ही बातमी अफ़वा आहे अस मत नगरपालिका प्रशासनाने मांडले आहे, मग सकाळ पेपर ला आलेली न्युज आणी फोटो जल शुद्धीकरन केंद्रावर मोकाट कुत्र्यांचा वावर होतोय, असे निदर्सनास आले, मग ती पण अफ़वा आहे का, ईदगाह भागातील केंद्रावरिल प्रकार ही बातमी नुसती बातमी नसून बीड करांच्या जीवाशी खेळण्याचा विषय आहे या बाबतीत गांभीर्याने विचार झाला पाहिजे, मुख्य अधिकाऱ्यांना जवाब विचारणार कोणी नाहीच ना, त्या मुळे पिण्याच्या पाईप लाईन मध्ये आज सडलेले कुत्रे निघतात उद्या डुक्कर पण निघतील, बीड च्या सर्व पदाधिकारांनी सरळ राजीनामा द्यावा कशाला नगरपालिकेचे अधिकारी म्हणून मिरवतात तुम्हाला जर बीड करांशी त्यांच्या जीवाशी काही घेणं देण नाही तर? बीड मध्ये विज नाही, पाणी नाही, कचऱ्याचा प्रश्न मार्गी नाही स्वछता नाही, सर्वांत घाण माझे शहर म्हणायची वेळ आली आहे प्रत्येक पदाधिकारीही सतेच्या नावाखालि स्वतःला मोठे करताय् आणी बीड च्या जनतेच्या जीवाशी खेळताय धिक्कार असो अश्या पद घेऊन बसलेल्या अधिकाऱ्यांचा, लोकांचा जीव गेला तरी चालेल पण आपले पगार बंद नाही झाले पाहिजे सर्व साधारण जनतेचे नगरपालिका अधिकाऱ्यांनी फोन नाही उचलायचे, नगर पालिकेत गेले असता मुख्य अधिकाऱ्यांच्या खुर्च्या रिकाम्याच असतात, मग आम्ही जायचे कुठे?२१ एप्रिल पासून शहराला पाणी पुरवठा नाही, ज्यांच्या कडे पैसे आहेत ते लोक टँकर मागवतात, विकत पाणी घेताय, पण गरीब जनतेने काय करायचे,



कुठे जायचे, ज्यांना एकवेळचे जेवण नाही त्यांनी रोज कसे पाणी विकत घ्यायचे निदान त्यांना तरी काही पर्यायी व्यवस्था नगरपालिका प्रशासनाने द्यावी, कळकळीची विनंती आहे, कचऱ्या मुळे शहरात रोगराई पसरते आहे, शहरातील काही मुख्य ठिकाणी जिथं घर, लहान मुलांचा, इतर लोकांचा सतत वावर आहे अशा ठिकाणी रस्त्याच्या दुथडी कचरा ओसंडत आहे, घाणच घाण, दुर्गंधी पसरलेली आहे, का या सर्व गोष्टींची गांभीर्याने दखल घेतली जात नाही, नळपट्टी, घरपट्टी, लाइटबील सर्व काही अगदी न विसरता नागरिकांकडून वसुल केले जाते, मग त्या बदल्यात आम्हाला काय मिळते? बीड ची जनता निर्जीव आहे का म्हणून इतका अत्याचार सुरु आहे, बीड च्या प्रत्येकाने आपापल्या भागातील प्रश्न प्रशासनाकडे पोहचवा नहिं तर लवकरच एक मोठ आंदोलन करूया जेणेकरून काहीतरी मार्ग निघेल. अशी कळकळीची विनंती तेजस्विनी ग्रूप संस्थापिका सोनल पाटील यांनी प्रसिध्दी पत्रकाच्या माध्यमातून केली आहे.

# विदर्भ, उत्तर महाराष्ट्रातील खारपाण पट्ट्याला ५.७८ लाख एकर सिंचन लाभ : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## तापी मेगा रिचार्ज प्रकल्पाबाबत महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशात ऐतिहासिक करार

भोपाळ, दि. 10 : तापी मेगा रिचार्ज प्रकल्पाबाबत महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश या दोन राज्यांमध्ये एका ऐतिहासिक करारावर स्वाक्षरी करण्यात आली. सुमारे 19,244 कोटींच्या या करारामुळे विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील खारपाण पट्ट्याला मोठा लाभ मिळणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज भोपाळ येथे दिली. सिंचन आणि जलविद्युत प्रकल्पांबाबत महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश आंतरराज्य नियंत्रण मंडळाची बैठक आज भोपाळ येथे झाली. या बैठकीला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव, दोन्ही राज्यांचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, तुलसीराम सिलावट, कुंवर विजय शाह आणि दोन्ही राज्यांचे अधिकारी उपस्थित होते. या बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांना याबाबत माहिती दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आजचा दिवस हा महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशसाठी ऐतिहासिक आहे. ताप्ती मेगा रिचार्ज प्रकल्पाचा आम्ही पूर्वीच संकल्प केला होता. आज त्यावर दोन्ही राज्यांनी सहमती केली आणि त्यासाठी सामंजस्य करार झाला. यापूर्वी ही बैठक 2000 मध्ये बैठक झाली होती, त्यानंतर 2025 मध्ये ही बैठक झाली. परंतू या प्रकल्पाबाबत दोन्ही राज्य परस्परांच्या संपर्कात होते. केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार आल्यानंतर त्यांनी आंतरराज्य जलकरारांना गती देण्यास सांगितले आणि 2016 पासून आम्ही याला गती दिली. तापी मेगा रिचार्ज हे जगातील एक आश्चर्य आहे. या प्रकल्पामुळे महाराष्ट्राला 2,34,706 हेक्टरला सिंचनलाभ होईल, तर मध्यप्रदेशला 1,23,082 हेक्टर सिंचनलाभ मिळेल. महाराष्ट्रात जिथे खारपाणपट्टा आहे आणि त्यामुळे पिण्याच्या पाण्याच्या आणि सिंचनाच्या समस्या आहेत, तेथे मोठा लाभ या प्रकल्पामुळे होणार आहे. यात जळगाव, अकोला, अमरावती, बुलढाणा या पट्ट्यात मोठा दिलासा मिळेल. शेतकऱ्यांच्या जीवनात मोठी क्रांती होईल आणि अर्थव्यवस्थेला मोठी गती मिळेल.




केंद्रीय योजना म्हणून याचा स्वीकार व्हावा, अशी विनंती आता आम्ही दोन्ही मुख्यमंत्री मिळून केंद्र सरकारकडे पुन्हा करणार आहोत. या बैठकीत महाराष्ट्राचे मुद्दे सुद्धा आम्ही मांडले. त्यात डांगुर्ली बॅरेज, जामघाट असे महत्त्वाचे मुद्दे होते. या जामघाट प्रकल्पासाठी 28 वर्षांपूर्वी मी मध्यप्रदेशात तत्कालिन मुख्यमंत्र्यांसोबत आलो होतो. पण, आता त्यालाही गती मिळते आहे, याचा आनंद आहे. या जामघाटमुळे नागपूर शहरासाठी पुढच्या 30-40 वर्षांसाठी पाणी मिळणार आहे. आता ऑक्टोबरमध्ये पुढची बैठक घेण्यात येईल. महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश कोणत्या क्षेत्रात एकत्रित काम करु शकते, यादृष्टीने सुद्धा अनेक बाबींवर यावेळी चर्चा झाली, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली.

असा आहे तापी मेगा रिचार्ज प्रकल्प
- तापी नदीवर मध्यप्रदेशातील खरिया गुटी घाट येथे धरण
- एकूण सिंचनाला लाभ : 3,57,788 हेक्टर
- महाराष्ट्राला लाभ : 2,34,706 हेक्टर (जळगाव, अकोला, बुलढाणा, अमरावती) (म्हणजेच सुमारे 5.78 लाख एकर)
- मध्यप्रदेशला लाभ : 1,23,082 हेक्टर (बुऱ्हाणपूर, खंडवा)
- एकूण पाणीवापर : 31.13 टीएमसी
- महाराष्ट्र : 19.37 टीएमसी/मध्यप्रदेश : 11.76 टीएमसी
- योजनेची किंमत : 19,244 कोटी (2022-23 ची किंमत)

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
रविवार ११ मे २०२५
https://lokaarambh.com


## लग्न सोहळ्यात आग्या मोहोळाच्या मधमाशांचा हल्ला; वऱ्हाडी जखमी

जुन्नर - जुन्नरच्या आदिवासी भागातील खडकु ंबे येथील शुभविवाह सोहळ्यात आग्या मोहोळाच्या मधमाशांनी आज मंगळवार ता.०६ रोजी दुपारी हल्ला केला. या हल्ल्यात वऱ्हाडी मंडळी तसेच वधू वरांना शुभाशीर्वाद देणारे पुढारी देखील सापडले. मोहोळाच्या मधमाशांनी अचानक केलेल्या हल्ल्याने वधू वरासह वऱ्हाडी मंडळींची मोठी पळापळ झाली. ह्या घटनेने विवाह विधी देखील घाईगडबडीत आटोपता घ्यावा लागला. खडकुंबे येथील दिक्षा आणि धनंजय यांचा शुभविवाह अनपेक्षित विघ्नामुळे चांगलाच गाजला. दुपारच्या सुमारास मंगलाष्टका सुरू असताना अचानक एका मोठ्या आग्या मोहोळावरील मधमाशांनी हल्ला केल्याने एकच गोंधळ उडाला. या दुर्घटनेत अनेक वऱ्हाडी जखमी झाले असून त्यांना तातडीने जुन्नर येथील छत्रपती ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.खडकुंबे येथील गारे यांच्यासमोर दिक्षा व धनंजय (तेजस) यांचा विवाह मोठ्या उत्साहात आणि मंगलमय वातावरणात सुरू होता. दोन्हीकडील नातेवाईक आणि मित्रमंडळींच्या उपस्थितीने परिसर आनंदाने भरलेला होता. मात्र, दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास मंगलाष्टकांना सुरुवात झाली आणि मधमाशा गुंजारव करत मांडवात शिरल्याने एकच धांदल उडाली. वऱ्हाडी बचावासाठी घाबरून इकडे तिकडे धावू लागले. माशांनी अनेक जणांना चावा घेतला. महिला, पुरुष आणि लहान मुले भेदरून ओरडत होती. सर्वत्र एकच गोंधळाचे आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या घटनेत जखमी झालेल्यांना तातडीने उपचारासाठी जुन्नरच्या छत्रपती ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार मधमाशांच्या दंशाने अनेक जणांना सूज आली आहे. काही जणांना अधिक गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष देवराम लांडे, माजी पंचायत समिती सदस्य काळू शेळकंदे, सामाजिक कार्यकर्त्या सुनिता बोऱ्हाडे, तसेच नामदेव सरोगदे, रामदास करवंदे, भीमा भवारी आदी अनेक जण जखमी झाले आहेत. भूषण करवंदे याला मंचर रुग्णालयात दाखल केले आहे.

## पुण्यात दुचाकीवरील मृतदेहाचं गूढ उलगडलं!

पुण्यात घरगुती वादातून पतीनेच आपल्या आठ वर्षाच्या मुलासमोरच आपल्या पत्नीचा गळा दाबून हत्या केल्याची माहिती समोर आली आहे. पत्नीला निर्घृणपणे संपवून मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी जाताना त्याला पोलिसांनी पकडलं. त्यावेळी त्याने उडवा उडवीची उत्तर दिली. मात्र,पोलिसांना संशय आला त्यांनी त्याला घेऊन त्याचं घर गाठलं. घरी त्याच्या आठ वर्षांच्या चिमुकल्याने आपल्या डोळ्यांनी आपल्या बापाने आपल्या आईला जीवे मारल्याची डोळ्यांनी पाहिलेली हकीकत सांगितली. ही मन हेलावून टाकणारी घटना पुण्यातील नांदेड सिटी जवळ ही घटना घडली आहे. या घटनेबाबत सविस्तर माहिती पुण्याचे पोलीस उपायुक्त संदीप सिंह गिल यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे. या संपूर्ण प्रकरणाचा घटनाक्रम सांगताना पोलीस उपायुक्त संदीप सिंह गिल म्हणाले की, मकाल नांदेड सिटी पोलीस स्टेशनच्या हद्दीत ही घटना घडली आहे. लायगुड े मळा परिसरातील समृध्दी सोसायटीत हे जोडपं गेल्या दीड वर्षांपासून राहत होतं. आरोपी राकेशनं राहत्या घरात बबीताची हत्या केली. दोघेही मूळचे उत्तर प्रदेश येथील रहिवासी आहेत. दीड वर्षापासून ते पुण्यामध्ये राहायला आलेले होते. घटना घडली त्या दिवशी दोघांमध्ये घरगुती कारणावरून वाद झाला होता. सोमवारी रात्री आरोपी राकेशच्या वडिलांचा फोन आला होता. त्यांनी फोनवरून मुलगा राकेशकडे पैसे मागितले, मात्र, पत्नी बबीताने राकेशच्या वडिलांना पैसे देण्यासाठी नकार दिला.

## एका आठवड्यासाठी आयपीएल स्थगित

नवी दिल्ली भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढल्याच्या पार्श्वभूमीवर मोठा निर्णय घेतला आहे. इंडियन प्रीमियर लीगचा १८ वा हंगाम एका आठवड्यासाठी स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या कालावधीत वेळापत्रकातील बदल आणि उर्वरित सामन्यांचे आयोजन यासंदर्भातील परिस्थितीचे आकलन केल्यानंतर नवी माहिती दिली जाणार आहे. सर्व फ्रँचायजी आणि भागीदारांसोबत चर्चा केल्यानंतर स्पर्धा थांबवण्याचा निर्णय घेण्यात आला. बीसीसीआयने भारतीय सैन्यावर विश्वास दाखवत आणि सर्व घटकांच्या हितासाठी निर्णय घेण्यास कटिबद्ध असल्याचे सांगितले. बीसीसीआयने या परिस्थितीमध्ये भारतासोबत असल्याचे म्हटलें आहे. आयपीएलच्या १८ व्या हंगामात ५८ मॅचेस झालेल्या आहेत

## एक थेंब जवानांसाठी रक्तदात्यांनो, पुढाकार घेत रक्तदान करा -ॲड.शेख शाहजेब



बीड । प्रतिनिधी भारत-पाकिस्तान युद्ध सुरू आहे. यात काही जवान शहीद, तर काही जखमी होत आहेत. त्यांना वाचविण्यासाठी आपण पुढाकार घेत रक्तदान करावे, असे आवाहन जिल्हा रुग्णालय प्रशासनाने केले आहे. यासाठी याफ ठिकाणी करा रक्तदान बीड शहरातील सोमेश्वर मंदिरात सोमवारी रक्तदान करता येईल. तसेच गुरुवारी स्वामी समर्थ मंदिर, शनिवारी शनि मंदिर आणि पेंडगाव हनुमान मंदिरात शिबिराचे आयोजन केले आहे. याशिवाय आपण जिल्हा रुग्णालयातील रक्तपेढीत येऊनही रक्तदान करू शकता, असे ड.शेख शाहजेब यांनी केले आहे . जिल्हा रुग्णालयातील रक्तपेढीत सध्या रक्ताचा ठणठणाट आहे. अशातच भारत-पाकिस्तान युद्ध सुरू झाले आहे. त्यानुषंगाने आरोग्य विभागालाही सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. यात रक्तसाठा मुबलक ठ ेवण्यास सांगितले आहे. याच अनुषंगाने जिल्हा रुग्णालय प्रशासनाने आवाहन केले आहे. आपण सीमेवर लढण्यासाठी जाऊ शकत नाही, पण त्यांच्यासाठी रक्ताचा एक थेंब देऊः शकतो, अशी भावनिक साद घालत देशाच्या जवानांसाठी एक थेंब रक्ताचा द्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. जास्तीतजास्त दात्यांनी रक्तदानासाठी पुढे यावे, असे ॲड.शेख शाहजेब यांनी केले आह

# महाविद्यालयीन तरुणाला धमकावून पैसे मागणाऱ्या दोन पोलिस कर्मचाऱ्यांचे निलंबन

पुणे । प्रतिनिधी मैत्रिणीसोबत गप्पा मारत थांबलेल्या महाविद्यालयीन तरुणास गुन्हा दाखल करण्याची धमकी देत त्याच्याकडे ५० हजार रूपयांची मागणी करणाऱ्या येरवडा पोलिस ठाण्यातील दोन पोलिस कर्मचाऱ्यांचे निलंबन करण्यात आले आहे. परिमंडळ चारचे पोलिस उपायुक्त हिंमत जाधव यांनी दोन्ही पोलिसांच्या निलंबनाचे आदेश दिले. पोलिस कर्मचारी दयानंद शिवाजी कदम, अश्विन ईश्वर देठ ेअशी निलंबित केलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांची नावे आहेत. २४ एप्रिल रोजी सायंकाळी सात वाजता येरवडा येथील कॉमर्स झोन कंपनीजवळील रस्त्याच्याकडेला महाविद्यालयीन तरुण त्याच्या




मैत्रीणीसमवेत गप्पा मारत थांबले होते. त्यावेळी गस्तीवर असणारे पोलिस कर्मचारी देठे व कदम तेथे आले. त्यांनी तरुणावर कारमध्ये अश्लील कृत्य करत असल्याचा आरोप करुन गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली होती. तसेच गुन्हा दाखल न करण्यासाठी त्याच्याकडे ५० हजार रुपयांची मागणी केली. या प्रकारामुळे संबंधित तरुण मोठ्या प्रमाणात घाबरल्याने तो येरवडा येथील एका डॉक्टरांकडे गेला. त्यानंतर त्याने याप्रकरणी येरवडा पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. दरम्यान, संबंधित प्रकरण पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्याकडे गेले, त्यांनीही याप्रकरणी चौकशी करण्याचे आदेश दिले होते. संबंधित प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत वरिष्ठ पोलिस निरीक्षक रवींद्र शेळके यांनी याबाबतचा अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठवून दिला होता. त्यानंतर पोलिस उपायुक्त जाधव यांनी दोन्ही पोलिस कर्मचाऱ्यांची चौकशी केली. त्यांचे वर्तन बेशिस्त, अशोभनीय व बेजाबदारपणाचे आहे. त्यांच्या वर्तनामुळे पोलिस दलाची प्रतिमा मलीन होत असल्याचा ठपका ठेवत कदम व देठे या दोन्ही पोलिसांना निलंबित केल्याचा आदेश जाधव यांनी दिला. दरम्यान, संबंधित प्रकरणात पोलिस कर्मचारी दोषी आढळले आहेत. त्यांना निलंबित करून याप्रकरणाची सखोल चौकशीची जबाबदारी लोणीकंद पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सर्जेराव कु ंभार यांच्यावर सोपविली आहे.फ असे जाधव यांनी सांगितल

## शिष्यवृत्ती परीक्षेत अमर अशोक भिल्लारे याचे घवघवीत यश



बीड - येथील द.बा.घुमरे पब्लिक स्कूल या शाळेने महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषद पुणे आयोजित पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता पाचवी परीक्षेमध्ये कोल्हारवाडी या छोट्याशा गावातून आलेल्या ग्रामीण भागातील चि.अमर अशोक भिल्लारे याने शहरी विभागातून घवघवीत यश संपादन केले आहे. या त्याने मिळवलेल्या यशाबद्दल शाळेचे सचिव श्री दीपकदादा घुमरे साहेब संस्थेच्या अध्यक्षा श्रीम.मंजुश्री घुमरे मॅडम मुख्याध्यापक श्री शेंडगे सर व सर्व शाळेतील शिक्षक वृ ंद तसेच घाडगे सरांचे नवोदय क्लासेस बीड चे संचालक श्री घाडगे सर,श्री मुसळे सर व सर्व शिक्षक वृ ंद तसेच सावता नगर,धांड े नगर व सोमेश्वर नगर येथील नागरिक यांच्या वतीने अमर भिल्लारे याचे सर्वत्र कौतुक होत आहे. तसेच कोल्हारवाडी ग्रामस्थ यांच्यावतीने त्याचा जाहीर सत्कार व शुभेच्छा देण्यात आल्या.

## ई-दृष्टीप्रकल्पाअंतर्गत ग्रामपंचायत क्षेत्रात सीसीटीव्ही प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी - जिल्हाधिकारी बीड यांची माहिती

बीड, दि. 9 मे 2025 : जिल्ह्यातील ग्रामपंचायत क्षेत्रांमध्ये सुरक्षा, पारदर्शकता आणि सामाजिक शिस्तीला चालना देण्यासाठी "ई-दृष्टी" प्रकल्प प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून गावातील महत्त्वाच्या ठिकाणी उच्च दर्जाचे, नाईट व्हिजन सुविधा असलेले सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी बीड यांनी दिली. प्रकल्पाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत : ग्रामसुरक्षा वाढवून चोरी, वाद व गैरकृत्यांवर नियंत्रण ठेवणे शाळा, अंगणवाडी, आरोग्य केंद्रे आणि महिला-मुलांच्या सुरक्षिततेसाठी देखरेख सामाजिक शिस्त आणि नागरिकांमध्ये जबाबदारीची भावना निर्माण करणे आपत्ती व आपत्कालीन परिस्थितींमध्ये त्वरित प्रतिसाद देणे आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांचे व रुग्णांचे संरक्षण शासकीय व ग्रामपंचायतीच्या मालमत्तेचे रक्षण स्वच्छता व नियमांचे पालन यावर देखरेख कार्यालयीन कामकाजावर नियंत्रण ठेवून पारदर्शकता वाढवणे प्रकल्पाअंतर्गत शाळा, अंगणवाडी, चावडी, आरोग्य केंद्र/उपकेंद्र, ग्रामपंचायत कार्यालय, प्रमुख चौक व सार्वजनिक स्थळे या ठिकाणी किमान ५ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्रकल्प अंमलबजावणीसाठी समित्यांची रचना : जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय व ग्रामस्तरीय समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. ग्रामस्तरीय समितीमध्ये सरपंच अध्यक्ष आणि ग्रामविकास अधिकारी सदस्य सचिव म्हणून कार्य करतील. प्रत्यक्ष कॅमेरे बसविण्याची जबाबदारी ग्रामस्तरीय समितीची असेल. महत्त्वाचे निर्देश : कॅमेऱ्यांचे रेकॉर्डिंग किमान १५ दिवस जतन करणे आवश्यक आहे. निधी उभारणीसाठी CSR, लोकसहभाग, स्वयंसेवी संस्था तसेच सामान्य निधी/ डीव्हीडीएफ/१५ वा वित्त आयोग व्याज वापरण्याचे निर्देश. १४ ऑगस्ट २०२५ पर्यंत जिओटॅग फोटोसह कॅमेऱ्यांची माहिती सादर करणे आवश्यक आहे.

प्रकल्पाची कालमर्यादा : २० मे २०२५ ते १४ ऑगस्ट २०२५ "ई-दृष्टी" प्रकल्पामुळे ग्रामपंचायत क्षेत्रात सुरक्षा, पारदर्शकता आणि जबाबदारी यांचा दर्जा मोठ्या प्रमाणात उंचावेल. हा प्रकल्प वेळेत व काटेकोरपणे पूर्ण करण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने सर्व संबंधित विभागांना केले आहे.

## बीड जिल्हाधिकाऱ्यांनी सुरु केला तीन दिवस जनता दरबार; जिल्ह्यातील तहसीलदारांनी निदान आठवड्यातुन एक दिवस तरी घ्यावा - गणेश शेवाळे यांची मागणी

पाटोदा (प्रतिनिधी)
बीड जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालयात नागरिकांच्या तक्रारी, अडचणी व निवेदने थेट ऐकण्यासाठी आठवड्यातून तीन दिवस ङ्गजनता दरबारफ आयोजित केला जात आहे. या उपक्रमाला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते गणेश शेवाळे यांनी बीड जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांनीही निदान आठवड्यातून एक दिवस जनता दरबार घ्यावा, अशी मागणी केली आहे.गणेश शेवाळे म्हणाले, ङ्गजिल्हाधिकाऱ्यांकडून लोकाभिमुख प्रशासनाची चांगली



सुरुवात झाली आहे. मात्र तालुका पातळीवर अद्याप नागरिकांच्या तक्रारी थेट ऐकण्यासाठी कोणतीच ठोस व्यवस्था नाही. त्यामुळे जिल्ह्यातील तहसील कार्यालयातही आठवड्यातून एक दिवस तरी जनता दरबार घेण्यात यावा.ङ्गसध्या नागरिकांना आपल्या तक्रारींसाठी वारंवार तहसील कार्यालयाचे चकरा माराव्या लागतात. तक्रारी वेळेत न सुटल्यामुळे नाराजी वाढत आहे. तहसीलदारांनी ठराविक दिवशी नागरिकांची थेट गाऱ्हाणी ऐकून तत्काळ निराकरण केल्यास लोकांचा विश्वास अधिक दृढ होईल, असेही गणेश शेवाळे यांनी नमूद केले.

पाटोदा तालुक्यातील नागरिकांची प्रतिक्रिया
ङ्गतहसील कार्यालयात एक दिवस ठरवून अधिकारी थेट भेटले, तर आम च्यासारख्या ग्रामीण भागातील लोकांना मोठा दिलासा मिळेल,ङ्ग असे अनेकांचे मत आहे.
जिल्हाधिकाऱ्यांच्या उपक्रमाचे अनुकरण करत तहसीलदारांनीही लोकाभिमुख कार्यपद्धती अवलंबावी, अशी आता जनतेची आणि सामाजिक कार्यकर्त्यांची अपेक्षा आहे.

## शिवसेनेने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरास देशाभिमान दाखवत मुस्लिम तरुणांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद- उल्हास गिराम

बीड : (प्रतिनिधी ) पाकिस्तानी दहशतवाद्या विरोधात भारतीय सैन्यानी सुरु केलेल्या युद्धात शहीद भारतीय जावनाच्या शौर्याप्रति सदभावना म्हणून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिह्लाप्रमुख उह्लास गिराम यांनी आज बीड शहरांत रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरास देशाभीम असणाऱ्या तरुणांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला. विशेष म्हणजे मुस्लिम बांधवानी ही रक्तदान करून देशाप्रति सदभावना दाखवली. याशिबिरास सह संपर्क प्रमुख




बाळासाहेब अंबुरे, दैनिक झुंजार नेता चे संपादक अजित वरपे, दैनिक सामना चे जिह्लाप्रतिनिधी उदय जोशी सर, जिह्ला संघटक नितीन धांडे, उपजिह्लाप्रमुख हनुमंत जगताप, कर्मवीर परिवाराचे सोमनाथ धांडे, गणेश जाधव, राहुल जामकर, नंदकुमार येवले, सुरेश तात्या शेटे, माजी नगरसेवक सुधीर भांडवले, यांनी भेट दिली. या शिबिरास उपजिह्लाप्रमुख संजय महाद्वार, लक्ष्मण बहिरवळ सुशील पिंगळे, रतन तात्या गुजर, नवनाथ प्रभाळे, सरपंच प्रदीप कोटुळे, अतुल लोणकर, योगेश वादे, अझर सय्यद, ज्ञानेश्वर दाभाडे, सुजित गिराम, गिरीश गिराम, वैभव प्रभाळे, महेश भोसले, सौरभ इंगोले यासह अनेक तरुणांनी रक्तदान शिबिरास सहभाग नोंदवला.

# बीडजवळ भीषण अपघात, कारची लक्झरी बसला धडक; १५ वर्षीय मुलासह वडील ठार

बीड । प्रतिनिधी राज्यातील रस्ते अपघाताचे प्रमाण गेल्या काही वर्षात वाढल्याचे पाहायला मिळत असून केंद्रीय दळणवळणमंत्री नितीन गडकरी यांनी देखील याबाबत चिंता व्यक्त केली होती. वर्तमानपत्रात किंवा माध्यमांमध्ये सातत्याने अपघाताच्या बातम्या येत असून महामार्गावरच हे अपघात घडत असल्याचे दिसून येते. आता, बीड जिल्ह्यातील पाटोद्याजवळ एका भीषण अपघातात वडिल आणि मुलाचा दुर्दैवी अंत झाला आहे. दरम्यान, दोघांचेही मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठविण्यात आले आहेत. बीडच्या पाटोदा शहराजवळ पुण्याहून केजकडे जाणारी भरधाव वेगातील कार पुलाच्या कठड्याला धडकून ट्र ॅव्हल्सवर जाऊन आदळली. या अपघातात अश्फाक शेख (४० वर्षे) आणि त्यांचा मुलगा अल्ताफ शेख (१५ वर्षे) हे दोघेही जागीच ठार झाले आहेत. पुण्यावरुन हे दोघेही आपल्या गावी म्हणजेच केजकडे येत होते. मात्र, पाटोदाजवळ आले असता त्यांच्या कारचा अपघात झाला. चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने ती कार पुलाच्या कठड्याला धडकली. त्यानंतर तीन पलट्या खाऊन समोरून येणाऱ्या एका खासगी कंपनीच्या ट्रॅव्हल्सवर जाऊन आदळली. त्यात कारमधील दोघांचाही मृत्यू झाला.




दरम्यान, अपघाताची माहिती मिळताच पाटोदा पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत कारमधून मृतदेह बाहेर काढले. त्यानंतर, मृतदेह पाटोदा ग्रामीण रुग्णालयात उत्तरीय तपासणीसाठी दाखल करण्यात आले. याप्रकरणी अधिक तपास पोलीस करत आहेत. लक्झरी बस जळून खाक सोलापूर-पुणे हायवेवरती हैदराबादकडून मु ंबईकडे निघालेली लक्झरी बस अचानक पेटू न जळून गेल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. बेस्ट एक्सप्रेस नावाची लक्झरी बस नं .छङ ०१ इ १८२४ ही हैदराबादकडून मुंबईकडे जात असताना चालू वाहनाने अचानक पेट घेतला. यावेळी स्थानिक व पोलिसांनी सतर्कता दाखवत गाडीतील प्रवाशांना तातडीने खाली उतरवले आणि अग्निशमक बोलवून आग विझवण्यास सुरुवात केली. दोन तासाच्या प्रयत्नानंतर आग विझली. मात्र, तोपर्यंत ही लक्झरी बस संपूर्णपणे जळून गेली होती. यात प्रवाशांचे प्राण वाचवण्यात पोलिसांना यश आले असले तरी गाडीच्या डीकीमधील बॅगा, मोबाईल, लॅपटॉप, आंबे, खाण्याचे साहित्य, मसाल्याचे वस्तू कपडे इत्यादी साहित्य पूर्णपणे जळून गेले आहे.

## रुग्णालयात गळफास घेतलेल्या रुग्णाचा जीव वाचवण्यासाठी बाजीराव चव्हाण युवामंच आले धावून



बीड । प्रतिनिधी बीड जिल्हा रुग्णालयाच्या दारात असणाऱ्या वडाच्या झाडाला एका तरुणाने गळफास घेतला.फाशी घेत असताना अनेकांनी पाहिले. पण त्याला सोडण्यासाठी कोणीही वर जात नव्हता. जिल्हा रुग्णालय सुरक्षा गार्ड - फौजी पटाईत यांनी झाडावर चढत त्याला सोडवलं. सध्या त्याची प्रगती गंभीरच आहे. यावेळी उपस्थित असणाऱ्या बाजीराव चव्हाण युवा मंच रुग्णसेवक कपिल योगदंड व रुग्ण नातेवाईक, जिल्हा रुग्णालय सिक्युरिटी गार्ड म्बुलन्स चालक, यांच्या मदतीने तात्काळ रुग्णाला झाडावरून तात्काळ खाली उतरवून त्याच्यावर उपचार करण्यात आला. सद्या रुग्णालयातील अपघात विभागात रुग्णावर उपचार सुरू आहे. प्राथमिक माहितीनुसार तो वांगी गावचा असल्याची माहिती समोर येते. त्याने भर दुपारी हे पाऊल का उचललं. त्याच्यावर सध्या जिल्हा रुग्णालयायात उपचार सुरू आहेत. जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर संजय राऊत, डॉक्टर संतोष शहाणे, यांच्या मार्गदर्शनाखाली डॉक्टर आणि बाजीराव दादा चव्हाण युवा मंच चे जोगदंड व त्यांची सर्व टीम उपचारासाठी आपली रुग्ण सेवा बजावताना दिसत आहेत

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

# भारत -पाकिस्तानमध्ये तणाव, मुंबई पोलिसांचा मोठा निर्णय; आता या गोष्टींवर बंदी

पहलगाममध्ये मोठा दहशतवादी हल्ला झाला होता, या हल्ल्यामध्ये 26 जणांना आपला जीव गमवावा लागला, यामध्ये 25 भारतीय तर एका नेपाळी नागरिकाचा समावेश होता. या हल्ल्यानंतर भारतानं पाकिस्तानविरोधात कठोर पाउलं उचलली, सिंधू पाणी वाटप कराराला स्थगिती देण्यात आली, तसेच पाकिस्तानी नागरिकांचे व्हिसा देखील रद्द करण्यात आले, त्यानंतर भारतानं पाकव्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानमध्ये एअर स्ट्राईक केला, या हल्ल्यामध्ये दहशतवाद्यांची 9 ठिकाणं उद्धस्त करण्यात आली. भारताच्या ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानचा चांगलाच जळफळाट झाला आहे. पाकिस्तानकडून भारतावर हल्ल्याचा प्रयत्न होत आहे, मात्र भारताकडून हे हल्ले परतून लावण्यात आले आहेत. प्रत्युत्तर म्हणून भारतानं देखील पुन्हा एकदा पाकिस्तानवर एअर स्ट्राईक केला, या हल्ल्यामध्ये पाकिस्तानची संपूर्ण रडार सिस्टिम उद्धस्त करण्यात आली आहे, या हल्ल्यांमध्ये पाकिस्तानचं मोठं नुकसान झालं आहे. त्यामुळे आता भारत आणि पाकिस्तानमधील तणाव प्रचंड वाढला आहे. या सर्व



पार्श्वभूमीवर मुंबई पोलिसांनी आता मोठा निर्णय घेतला आहे. मुंबईत उद्यापासून फटाके आणि रॉकेट उडवण्यावर बंदी घालण्यात आली आहे. सीमेवरील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर मुंबई पोलिसांनी हा निर्णय घेतला आहे. 11 मे पासून ते 9 जूनपर्यंत मुंबईत फटाके फोडण्यावर बंदी घालण्यात आली आहे, या संदर्भात मुंबई पोलिसांकडून आदेश जारी करण्यात आले आहेत. पाकिस्तानकडून कुरापती सुरूच दरम्यान पाकिस्तानकडून कुरापती सुरूच आहेत, भारताच्या ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानने भारतावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला, भारतानं हा हल्ला परतून लावला, त्यानंतर भारतानं प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानवर पुन्हा एकदा ड्रोन हल्ला केला, पाकिस्तानच्या 15 शहरांमध्ये 50 ड्रोन हल्ले करण्यात आले, या हल्ल्यामध्ये पाकिस्तानची रडार सिस्टिम उद्धस्त करण्यात आली, मात्र त्यानंतर देखील पाकिस्तानने भारतावर हल्ल्याचा प्रयत्न केला, सीमा भागामध्ये देखील पाकिस्तानकडून गोळीबार सुरूच आहे. भारताकडून देखील पाकिस्तानच्या या कृतीला चोख प्रत्युत्तर देण्यात येत आहे, भारतानं केलेल्या हल्ल्यांमध्ये पाकिस्तानचं मोठं नुकसानं झालं आहे. त्यामुळे तणाव आणखी वाढला आहे.

## विद्युत पुरवठा सुरळीत राहील याची दक्षता घ्या : जिल्हाधिकारी जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला महावितरणच्या कामांचा आढावा मान्सूनपुर्व कामे तात्काळ पूर्ण करण्याचे निर्देश


नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : सध्या नांदेड जिल्ह्याचा पारा 43 अंशाच्या जवळपास असून हवेत प्रचंड उकाडा वाढला आहे. त्यामुळे ग्राहकांची विजेची मागणी वाढली असून पुरवठा कमी पडत आहे. त्यामुळे वारंवार विज पुरवठा बंद पडण्याच्या घटना वाढल्या आहेत. याबाबत महावितरण विभागाने आवश्यक त्या उपाययोजना करुन विद्युत पुरवठा सुरळीत राहील यांची दक्षता घ्यावी, असे निर्देश जिह्लाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले. जिह्लाधिकारी कार्यालयात महावितरण विभागाच्या कामाचा आढावा जिह्लाधिकारी राहुल कर्डिले यांनी घेतला. यावेळी निवासी उपजिह्लाधिकारी महेश वडदकर, अधिक्षक अभियंता सुधाकर जाधव, कार्यकारी अभियंता विनय बहादूर, रुमदेव चव्हाण, मंगेश बोरगावकर तसेच महावितरण विभागाच्या



अधिकारी कर्मचारी आदीची उपस्थिती होती. यावेळी मान्सूमपुर्व कामे प्राधान्याने करा, विजेच्या समस्याबाबत ग्राहकांशी, नागरिकांशी सुसंवाद ठेवा. उपकेंद्राची रोहित्र क्षमता वाढविण्याचे व मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना 2.0 तसेच इतर योजनेअंतर्गत उपकेंद्र रोहित्र वाढविण्याचे कामे प्राधान्याने पूर्ण करा. यंत्रणा अलर्ट मोडवर ठेवा, ग्राहकांचे मोबाईल क्रमांक अपडेट करुन घ्या. उपकेंद्राची रोहित्र क्षमता वाढविण्याचे कामे 10 दिवसांत पूर्ण होतील यांची काळजी घेण्याच्या सूचना जिह्लाधिकारी राहुल कर्डिले यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच दुरुस्तीचे कामे करताना महावितरणने ग्राहकांची गैरसोय होणार नाही यासाठी मॅसेज पाठवून पुर्वसूचना द्यावी. यामुळे ग्राहकांच्या तक्रारी वाढणार नाहीत. तसेच दुरुस्तीच्या कामासाठी अद्ययावत यंत्राचा वापर वाढवावा. यासाठी आवश्यक त्या साहित्यांची खरेदी करावी अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. नांदेड जिल्ह्यात 1 हजार 725 गावे व 720 वाडीपाडे असून या गावामध्ये महावितरणद्वारे विद्युतीकरण झालेले आहे. तसेच जिल्ह्यात एकूण 6 लाख 29 हजार 147 विज ग्राहक आहेत. या सर्व ग्राहकांना उन्हाळयाच्या पार्श्वभूमीवर विज पुरवठा करताना विजेच्या मागणीनुसार पुरवठा कमी पडत आहे. त्यानुसार महावितरण विभागाकडून उपकेंद्राची रोहित्र क्षमता वाढविण्याचे काम सुरु आहे. त्यामुळे ही समस्या लवकरच सुटण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याची माहिती महावितरणचे अधिक्षक अभियंता सुधाकर जाधव यांनी दिली. तसेच यावेळी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना 2.0, नवीन उपकेंद्रे मुख्यमंत्री सौर ऊर्जा वाहिनी योजना प्रणाली सुधारणा, नवीन अतिरिक्त उपकेंद्र रोहित्र मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना 2.0 प्रणाली सुधारणा , एबीडी योजनेअंतर्गत्तच्या प्रस्तावित कामांची माहिती, नवीन उपकेंद्रे, सुधारित वितरण क्षेत्र योजना, वाहिनी विलगीकरण उपाययोजना, सोलार प्रकल्प यातील प्रगतीपथावर असलेल्या कामांची माहिती सादरीकरणाद्वारे दिली.

## मांजरसुंभा ते पाटोदा राष्ट्रीय महामार्गावर लिंबागणेश येथे सायंकाळी मोटार सायकलस्वार आणि कंटेनरचा अपघात ; जखमीला जिल्हा रुग्णालयात हलवले



लिंबागणेश:- ( दि.१०) आज दि.१० शनिवार रोजी सायंकाळी सव्वा सात वाजता मुळुकवाडी येथील महादेव आजिनाथ ढास वय ४० वर्षे हे मोटार सायकल ( वाहन क्रमांक एम.एच.२३ ए.एल.७२३०) वरून लिंबागणेशकडे जात असताना मांजरसुंभा ते पाटोदा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी वरील लिंबागणेश परीसरातील हाँटेल राजयोग समोर सकाळपासून रोडच्या साइडला फेल झाल्याने पंख्यावर उभे असणारे कंटेनर (वाहन क्रमांक एन.एल.०१ एक जी ५५९० ) यांना समोरून वाहन आल्याने नियंत्रण सुटल्याने कंटेनर वर आदळली.यामध्ये महादेव ढास गंभीर जखमी झाले असुन त्यांना तातडीने खाजगी वाहनाने बीडला खाजगी रुग्णालयात हलविण्यात आले आहे. संबंधित अपघाताची कल्पना नेकनुर पोलिस स्टेशनचे व लिंबागणेश पोलिस चौकीचे कर्मचारी यांना देण्यात आली आहे.

## १४-मे रोजी राजधानी दिल्ली येथे छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : भारताची राजधानी दिल्ली येथे दिनांक १४- मे २०२५ रोजी छत्रपती संभाजी महाराज यांच्या जन्मोत्सवा निमित्त राष्ट्रीय जयंती महोत्सव समिती आणि सांस्कृतिक कार्य संचालनालय महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती संभाजी महाराज यांच्या ३६८ वा जयंती महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे.या महोत्सवाचे साक्षीदार होण्यासाठी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन छावा मराठा संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष इंजि.तानाजी हुस्सेकर यांनी केले आहे.

## बीड जिल्हयातुन ६९० प्रकरणे राष्ट्रीय लोकअदालतमध्ये निकाली

बीड दि. 10 :- महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशावरून आनंद एल. यावलकर प्रमुख जिह्ला व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिह्ला विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि. 10 मे 2025 रोजी पार पडलेल्या लोक न्यायालयात बीड जिह्लयातुन एकून 690 प्रकरणे तडजोडीने निकाली निघाली आहेत. बीड जिह्लयातून न्यायालयातील प्रलंबीत प्रकरणांपैकी एकूण 10306 प्रकरणे ठेवण्यात आली होती. यामध्ये दिवाणी, फौजदारी, मोटार अपघात, भुसंपादनाची प्रकरणे, 138 एन.आय.ॲक्टच्या प्रकरणांचा समावेश होता. त्यापैकी 389 प्रकरणे निकाली निघाली आहेत. तर दाखलपुर्व प्रकरणामध्ये एकूण 14858 प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी 301 प्रकरणे निकाली निघाली आहेत. असे एकूण 690 प्रकरणे निकाली निघाली आहेत व यामध्ये 5 कोटी 84 लाख 73 हजार 158 एवढ्या रकमेची प्रकरणे निकाली निघाली आहेत. सदरील लोक न्यायालयाच्या प्रसंगी जी. जी. सोनी, सदस्य सचिव, जिह्ला विधी सेवा प्राधिकरण



बीड यांच्यासह, श्रीमती. एस. आर. पाटील , जिह्ला न्यायाधीश -1, श्रीमती एस.आर.शिंदे , जिह्ला न्यायाधीश, के. आर. जोगळेकर, जिह्ला न्यायाधीश 4 तसेच इतर पॅनल प्रमुख, बीड जिह्ला वकील संघाचे अध्यक्ष आर.डी.येवले यांच्यासह वकील संघाचे सर्व पदाधिकारी जिह्ला सरकारी वकील व सर्व सरकारी अभियोक्ता यांची लोकन्यायालयात प्रमुख उपस्थिती होती. न्यायालयीन अधिकारी, कर्मचारी, बँक कर्मचारी, पोलीस कर्मचारी व इतर कार्यालयीन कर्मचारी यांनी लोकअदालत यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# भारतीय सैनिकांसाठी आज बीडमध्ये मोटरसायकल तिरंगा रॅली देशभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे :- राजेश्वर चव्हाण ,बळीराम गवते

बीड (प्रतिनिधी) पहलगाम हल्ल्यानंतर ऑपरेशन सिंदूर राबवत भारताने पाकिस्तानातील दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त केले. पाकिस्तानच्या प्रत्येक हल्ल्यावर जशास तसे उत्तर भारत देत आहे. भारतीय सैनिकांचे मनोबल वाढविण्यासाठी आज दि.11 मे 2025 रोजी सकाळी दहा वाजता बीडमध्ये मोटार सायकल रॅली काढण्यात येणार आहे. एक देशभक्त, भारतीय नागरिक म्हणून ही रॅली काढण्यात येणार आहे. यामध्ये देशभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, बळीराम गवते यांनी केले आहे. भारतीय सैनिकांनी जम्मू काश्मीर मधील पहलगाम हल्ल्यानंतर 'ऑपरेशन सिंदूर' राबवत शत्रू राष्ट्र असलेल्या पाकिस्तानवर एअरस्ट्राइक करत प्रत्युत्तर



देऊन अनेक दहशतवादी अड्डे उद्धवस्त केले. पहलगामच्या हल्ल्यातील



नागरिकांच्या जखमा ओल्या असताना क्षणार्धात पाकिस्तानात घुसून आपल्या भारतीय भुदल,नौदल आणि हवाईदलाच्या जांबाज अधिकाऱ्यांनी आणि जवानांनी दाखविलेल्या साहसाला आणि धैर्याला सलाम करून खरेखरचं देशप्रेमाची भावना जागी करण्यात आली. यामुळे बीडमध्ये आज दि. 11 मे रोजी सकाळी 10 वाजता तिरंगा रॅली काढून भारतीय जवानांचे मनोबल वाढविण्यात येणार आहे. सकाळी 10 वाजता महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यापुतळ्यापासून दुचाकी रॅलीला सुरुवात होणार आहे. माळीवेस, सुभाष रोड, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चौक मार्गे छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ रॅलीचा समारोप करण्यात येणार आहे. यामध्ये देशभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, बळीराम गवते यांनी केले आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com